# भारतातील कामगार चळवळीचा उदय आणि वाटचाल

**श्री. किरण गणपत कुंभार,** सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव, kirangkumbhar@gmail.com

---

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतात शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न नेहमीच महत्त्वाचे राहिले आहेत. आधुनिक काळात औद्योगिकीकरणानंतर लाखोंच्या संख्येने कामगार हा घटक तयार झाला आहे. त्यामुळे त्याच्या वैयक्तिक प्रश्नांऐवजी सामूहिक स्वरूपाचे प्रश्न एकत्र येऊन ते प्रश्न सोडवण्यासाठी कामगार एकत्र काम करू लागले. कामगारांचे कल्याण, आणि सर्वांगीण प्रगती ही उद्दिष्टे साध्य करायची होती. अशा संघर्षाने चळवळीचे रूप धारण केले. भारताने १९ व्या आणि २० व्या शतकात औद्योगिकीकरण पाहिले. कामगार वर्गाला जन्म देऊन असमान वर्ग व्यवस्था निर्माण केली. अशाच प्रकारचे हितसंबंध असलेल्या मजुरांनी एकजुटीने यंत्रणेवर दबाव आणण्यास सुरुवात केली. त्यामुळे मुंबईत कामगार चळवळीचा उदय झाला. कामगार म्हणजे कामगार वर्ग ज्यांच्याकडे उत्पादनाचे साधन नाही; त्यांचे शारीरिक श्रम - कुशल किंवा अकुशल त्यांची उपजीविका कमावण्यासाठी विकतात. श्रम या शब्दाची व्याख्या "स्वतःच्या प्रयत्नांच्या आनंदाशिवाय इतर वस्तूंच्या प्राप्तीसाठी मनुष्याचा शारीरिक किंवा मानसिक प्रयत्न" अशी केली जाऊ शकते. कामगार चळवळ हा शब्द श्रमिक लोकांच्या सामूहिक संघटनेच्या विकासासाठी, सरकारांकडून, विशेषत: कामगार संबंधांना नियंत्रित करणाऱ्या विशिष्ट कायद्यांच्या अंमलबजावणीद्वारे त्यांच्या स्वत: च्या हितासाठी मोहीम राबवण्यासाठी एक व्यापक संज्ञा आहे.

**औद्योगिक विकास आणि कामगार संघटनांचा उदय:**

१८५० नंतर मुंबईत अनेक कामगार-केंद्रित उद्योग अस्तित्वात आले, ज्यामध्ये कापूस गिरण्या, कोळसा आणि रेल्वे जंक्शन प्रमुख होते. १८५१ ते १८५४ या काळात मुंबई आणि अहमदाबाद येथे कापूस उद्योग सुरू झाले. १८६१ - १२ सूत गिरण्या १८७४-१९, १८८७-४२ मुंबई, अहमदाबाद आणि कानपूर - प्रमुख केंद्रे २० होती. Imp Centers Factory Act १८८१- सर्वात महत्वाचे, ज्याने महिलांचे कामाचे तास अकरा तास आणि बाल कामगारांना सात तास केले. परंतु या कायद्यामुळे पुरुष कामगारांचे कामाचे तास कमी झाले नाहीत, ज्यांना दिवसात चौदा तासांपेक्षा जास्त काम करावे लागले. मजुरांच्या संख्येत वाढ झाली. १८८६ - ७४,००० मजूर कापूस उद्योगात १९०५ - १,९५,०००, १९०४ - ७५,४४९ कोळसा खाणीत मजूर मजुरांच्या समस्याही अनेक होत्या त्यामध्ये कमी पगार, कामाचे जास्त तास, गिरण्या-कारखान्यातील अस्वच्छता, सोयी-सुविधांचा अभाव, प्रशासक आणि मालकांकडून होणारी पिळवणूक आणि कामगार भरतीतील भ्रष्टाचार, कामाची अनिश्चितता, खराब राहणीमान, अपघाताविरूद्ध विमा नाही इत्यादी कंत्राटदारांकडून कामगारांची भरती करण्यात आली. कंत्राटदार मजुरांचा प्रमुख झाला. मजूर आर्थिकदृष्ट्या कंत्राटदारावर अवलंबून होते कारण त्यांनी कंत्राटदाराकडून कर्ज घेतले होते.[1]

**भारतातील कामगार चळवळीची वाटचाल**:

भारतात कामगार चळवळीला १९ व्या शतकापासुन सुरुवात झाली. इ.स. १८७४ मध्ये बॅनर्जी यांनी "श्रमजीवी" नावाचे कामगारांचे हितरक्षणासाठी पहिले वर्तमानपत्र काढले. बॅनर्जींनी कामगार क्लबची स्थापना केली. १८९० मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी "बॉंबे मिल हॅण्डस असोसिएशन" ही भारतातील पहिली कामगार संघटना काढली. श्री. लोखंडे कामगार असल्यामुळे त्यांना कामगारांच्या प्रश्नांबद्दल जाणिव होती. या संघटनेमार्फत कामगार प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी "दिनबंधू" नावाचे नियतकालीक काढले. बॉम्बे मिल हॅण्डस असोसिएशन पूर्वी कामगाराच्या दोन सभा झाल्या. त्यात आठवड्यातून एक दिवस सुटी, जेवणासाठी अर्धा तास सुटी, दर महिन्यास नियमित पगार, कामगारांना इजा झाल्यास नुकसान भरपाईच्या मागण्या मांडल्या होत्या. श्री. लोखंडे व सोरावजी बंगालींच्या प्रयत्नांनी कामगारांना एक दिवस आठवड्यातून सुटी मिळू लागली. १८७७ मध्ये नागपूरच्या मिल कामगारांनी पगार वाढीसाठी संप केला. १८८२ ते ९० पर्यंत मुंबई, मद्रास येथे कामगारांनी २५ संप केलेले दिसतात.

१८८७ ते ९० पर्यंत कामगारांनी चार संप केलेत. ते वर्धा हिंगणघाट मिलमध्ये झाले. १९०५ बंगालच्या फाळणीमुळे देशात निर्माण झालेल्या असंतोषाचा फायदा कामगार संघटना वाढीसाठी झाला. मुंबई गिरण्यात वीजेच्या वापरामुळे कामाचे तास वाढल्यामुळे कामगारांनी अनेक संप केलेले दिसतात. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना झालेल्या शिक्षेचा परिणाम म्हणून मुंबईच्या कामगारांनी निषेध म्हणून संप पुकारला. कामगारांनी सहा दिवस संप करुन आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. पहिला राजकीय संप कामगारांनी केला. १९१७ च्या रशियन क्रांतीच्या प्रभावाने भारतात अनेक कामगार संघटना निर्माण होऊ लागल्या. ॲनी बेझंटचे सहकारी व न्यू इंडियाचे सहसंपादक जी.बी.पी. वाडिया यांनी मद्रास मधील कामगारांना संघटीत करुन मद्रास लेबर युनियन ही आधुनिक धर्तीवरील कामगार संघटना स्थापन केली. ते या संघटनेचे अध्यक्ष झाले. त्यानंतर एक कामगार संघटना स्थापन केली. गांधींनी टेक्सटाल लेबर असोसिएशनची अहमदाबाद मध्ये स्थापना केली. पहिल्या महायुध्दातील व्हरसायच्या तहाने आंतरराष्ट्रीय कामगार संघटना स्थापन करण्याची गरज भासू लागली.[2]

**ऑल इंडिया ट्रेड युनियन :**

पहिल्या महायुद्धानंतर विविध क्षेत्रांत कामगार संघटना निर्माण झाल्या. कारण कामगारांची संख्या वाढली होती. यावेळी १६४ कापड गिरण्यांमधून २,६०,८४७ एवढे प्रचंड संख्येने कामगार कार्यरत होते. विखुरलेल्या विविध कामगार चळवळीत सूत्रबद्धता आणण्यासाठी व योग्य मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर कामगार संघटना स्थापन करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. शेवटी काँग्रेसच्या पुढाकाराने ७ जुलै १९२० रोजी परळ (मुंबई) येथे भरलेल्या कामगारांच्या सभेत 'अखिल भारतीय कामगार सभा' (All Indian Trade Union Congress) स्थापन झाली. 'ऑल इंडिया ट्रेड युनियन' ने एकूण ६४ छोट्या-मोठ्या कामगार संघटना व त्यातील १, ४०, ८५४ कामगार संलग्न करून घेतले. ३१ ऑक्टोबर १९२० रोजी संघटनेचे पहिले अधिवेशन लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली एम्पायर नाट्यगृह, मुंबई येथे भरले. जोसेफ बॅप्टिस्टा हे स्वागताध्यक्ष होते. काँग्रेसचे नेते मोतीलाल नेहरू, ॲनी बेझंट, विठ्ठलभाई पटेल, म. अली जीना वगैरे उपस्थित होते. लाला लजपतराय यांनी "संघटित व्हा, चळवळ करा आणि लोकांना शिकवा" असे आवाहन केले. या अधिवेशनात कामगारांना मताधिकार द्यावा, विधिमंडळात कामगारांचा प्रतिनिधी निवडला जावा, अशी मागणी करणारा ठराव पास केला. आयटक संघटनेत तात्वीक मतभेद होऊन संघटनेत फुट पडली. पण नंतर मतभेद न करुन एकी निर्माण करण्यात आली. परंतु दुसऱ्या महायुध्दाबद्दल साम्यवाद्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे साम्यवादी आणि राष्ट्रवादी यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे राष्ट्रवादी व समाजवादी नेते आयटक मधून बाहेर पडले.[3]

**एकीकृत राष्ट्रीय कामगार संघटना संघ :**

कामगारांवरील अन्याय दूर करण्यासाठी १९३४ साली नागपूर, सोलापूर, मुंबई इत्यादी ठिकाणी सार्वजनिक संप आयोजित केले, पण ब्रिटिश शासनाने कामगार संघ बेकायदेशीर ठरवून अनेक कामगार नेते तुरुंगात डांबले. कामगार शक्तीच्या मजबूत संघटनेची पुन्हा गरज भासू लागली. १९३५ साली रणदिवे- देशपांडे व १९३८ साली जोशी यांचा गट एकत्र येऊन 'राष्ट्रीय कामगार संघटना संघ' निर्माण झाली. १९३७ मध्ये सत्तेवर आलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळांनी कामगारांबाबत अनुकूल भूमिका घेतली. त्यामुळे १९४० पर्यंत कामगार चळवळत एकता निर्माण होऊन कामगारांचा जोम वाढला.[4]

**कामगार चळवळीचे नेते:**

मुंबईची कामगार चळवळ ही नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुरू केली. पण,त्यानंतरही कामगार चळवळीचे नेतृत्व हे ना.म.जोशी, डांगे, मिरजकर, परुळेकर, रणदिवे यांच्या पासून ते डॉ.एन.डी. पाटील, दत्ता सामंत यांसारख्या मराठी माणसांकडे कामगार चळवळीचं नेतृत्व राहिले आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर, सुरुवातीला भांडवलदार उद्योगांच्या डोक्यात मराठी भाषिक राज्यातील मुंबई मध्ये सरकार वर भांडवलदरांपेक्षा, कामगार, शेतकरी, समाजवादी विचार अधिक प्रभावित राहिल अशी अडगळ होती, कारण त्या लढ्याचे नेते होते, कॉ.ए.एम.डांगे,एस्.एम.जोशी,आचार्य प्र.के.अत्रे,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नेत्यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये कामगारांच्या न्याय हक्कांसाठी आवाज उठवला.[5] कामगार नेत्यांनी

कामगारांचे प्रश्न अत्यंत गांभिर्यानेघेतले व ते सोडविण्यासाठी सनदशीर मार्गांचा वापर केला त्यामुळे कामगार चळवळीने एक वेगळी ऊंची गाठली. स्वातंत्र्योत्तर काळात बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानिक व कायद्याचे संरक्षण कामगारांना मिळवून दिले. हे कामगार चळवळीचे यश आहे.

**समारोप:**

२० व्या शकतील कामगार चळवळीने कामगार हित समोर ठेऊन कामगार कल्याणचा एक टप्पा गाठला. कामगार चळवळीच्या वाटचालीचा आढावा घेतल्यावर २१ व्या शतकातील कामगार चळवळी समोर मोठी आव्हाने दिसून येतात. एका बाजूला ज्यांच्यावरती आजही खूप अन्याय होत आहे अशा असंघटित कामगारांची संख्या प्रचंड आहे आणि त्यांना संघटनेची गरजही प्रचंड आहे पण त्याच वेळी या असंघटित समाजाला आपल्यात सामावून घेण्यात संघटित कामगार चळवळ अयशस्वी ठरली आहे; परिणामतः तिचे स्वतःचे अस्तित्वही आज धोक्यात आले आहे.या परिस्थितीवर मात करून, कात टाकून पुन्हा एकदा कामगार चळवळीला ताठ कण्याने उभे राहायचे असेल तर त्यासाठी तिला कठोर आत्मचिंतन करावे लागेल आणि त्यानंतर कुठल्यातरी एखाद्या व्यापक ध्येयाची कास तिला धरावी लागेल. एखादे व्यापक ध्येय समोर असेल; तर माणूस मरगळ झटकून पुन्हा उभा राहू शकतो, जोमाने वाटचाल सुरू करू शकतो.[6] श्रमिकांना स्वातंत्र्याच्या प्रवाहात आणण्यासाठी भारतीय कामगार चळवळीने फार मोठे कार्य केलेले आहे. काळाचे आव्हान कामगार चळवळीने स्वीकारले पाहिजे. कामगारांच्या समस्या संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच सुटू शकतात. औद्योगिकीकरण हे रोजगारक्षम असले पाहिजे. ते रोजगारनिमिर्तीला बाधक बनता कामा नये. नव्या आथिर्क धोरणाबरोबरच उत्पादनक्षमतेसाठी आवश्यक म्हणून कामगारविषयक कायद्यातील जाचक अटी दूर व्हायला पाहिजेत. भांडवलदारी उत्पादनपद्धतीने व मुक्त बाजारव्यवस्थेने सामान्य जनतेचे प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच तीव्र होत चाललेले आहेत. अर्थविश्वात कामगार चळवळीशिवाय दुसरी कुठलीही सामाजिक शक्ति अस्तित्वात नाही. कामगारवर्गच शोषित व श्रमिक जनतेचे नेतृत्व करतो व ती एक क्रांतिकारी शक्ती आहे. अशा वेळी संघटित कामगार चळवळीवर या सर्वांचे नेतृत्त्व करण्याची जबाबदारी आहे. भारतीय कामगार चळवळ ही जागतिक कामगार चळवळीस मार्गदर्शक ठरली आहे.

**संदर्भ:**

1. https://www.scribd.com/document/519218610/Labour-Movement-in-Maharashtra
2. पाटील संभाजी, कामगार चळवळीचा विश्लेषनात्मक अभ्यास, रिव्हू ऑफ रिसर्च, खंड ७, नोव्हेंबर २०१७, पृ. १
3. सावळे दीपा , आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८ ते इ.स. १९०५), एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. ३९०
4. कित्ता, पृ. ३९१
5. खोलंबे प्रविण, भारतीय कामगार चळवळ, गौरव प्रकाशन
6. काळे भानू, कामगार संघटना : काही निरीक्षणे, डायमंड प्रकाशन, पुणे, पृ. ८